(आदेश ) रे.क. नं. ५२/२०१४
( लगमा वि. मारूती)

MHKO100001062014

# रे.क.नं. ५२/२०१४ मधील निशाणी क्र. ३७ वरील आदेश

वादी यांनी सदरचा अर्ज प्रतिवादी क्र. २ शिवराई केचाप्पा पुजारी यांचे वारस रेकॉर्डवर घेणेसाठी दाखल केला आहे. वादी यांचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र. २ शिवराई केचाप्पा पुजारी हे दिनांक ०९/०१/२०२१ रोजी मयत झाले आहेत. त्यांना अर्जात नमुद हेच सरळ व कायदेशिर वारस आहेत. प्रतिवादी क्र. २ यांच्या वारसांना रेकॉर्डवर घेवून त्याबाबतची दुरूसती करणे आवश्यक आहे. सबब अर्ज मंजूर करण्यात यावा.

**२.** प्रतिवादी यांनी सदरचे अर्जास आपले म्हणणे दाखल केले आहे. त्यांचे असे कथन आहे की, वादी यांनी जाणूनबुजून अर्ज देण्यास विलंब केला आहे. सबब अर्ज नामंजूर करण्यात यावा.

**३.** वादी यांचा अर्ज व त्यावर प्रतिवादी यांनी दाखल केलेले म्हणणे वाचले. दोन्ही बाजूंचे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

**४.** वादी यांनी सदरचा दावा प्रतिवादी यांचे विरुध्द हक्कज्ञापन व कायम मनाई ताकीदीकरीता दाखल केला आहे. वादी यांनी सदरचा अर्ज शपथेवर दाखल केला आहे. सदरच्या दाव्याचा गुणदोषावर निकाल करणेसाठी प्रतिवादी क्र. २ शिवराई केचाप्पा धनगर यांचे वारस रेकॉर्डवर येणे गरजेचे आहे. वादी यांनी निशाणी ३४ चे वर्णन यादीसोबत प्रतिवादी क्र.२ यांचा मृत्यू दाखला दाखल केला आहे. वादी यांचा निशाणी ३६ ला वारस रेकॉर्डवर घेणेसाठी झालेला विलंब माफ होवून मिळणेबाबतचा अर्ज व निशाणी क्र.३५ वर प्रतिवादी क्र. २ यांचे विरुध्द झालेला अबेटमेंट आदेश रद्द होवून मिळणेबाबतचा अर्ज मंजूर करण्यात आले आहेत. सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

(आदेश )

रे.क. नं. ५२/२०१४
( लगमा वि. मारुती)

**<u>आ दे श</u>**

१) अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२) वादी यांनी दाव्यात प्रतिवादी क्र.२ यांच्या वारसाबाबत योग्य ती दुरुस्ती करुन दुरुस्ती प्रत त्याच दिवशी दाखल करावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

सत्यमेव जयते

Digitally signed by DHANASHRI MAHADEV PAWAR
Date: 2025.09.26 11:13:42 +0530

ठिकाण – गडहिंग्लज
दिनांक २५/०९/२०२५

डी. एम. पवार
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर.
गडहिंग्लज